(गोपनीय)

# श्री. सुभाष देसाई, मा. मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसूचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत एक सदस्यीय चौकशी समितीचा अहवाल

(खंड ३/३)

(म.औ.वि.म., शासन व इतर संबंधीतांशी केलेला पत्रव्यवहार)

श्री. के.पी. बक्षी,

निवृत्त अपर मुख्य सचिव

दिनांक : २० मार्च, २०१८

४. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, शासन व इतर संबंधीतांशी केलेला पत्रव्यवहार

| क्र. | दिनांक | पत्र/शासन निर्णय/इत्यादींचा तपशील | विषय |
|---|---|---|---|
| १. | २८.०८.२०१७ | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एमआयएन १२१७/प्र.क्र. १८८/१७/२१ | श्री. के.पी. बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्यीय समिती यांची नियुक्ती करणेबाबत |
| २. | ३१.०८.२०१७ | श्री. संजय सेठी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना लिहिलेले गोपनीय पत्र | दिनांक ०६.०९.२०१७ रोजीच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक |
| ३. | ०८.०९.२०१७ | श्री. संजय सेठी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना लिहिलेले पत्र | केंद्रस्थ अधिकारी नेमण्याबाबत लिहिलेले मत्र |
| ४. | १४.०९.२०१७ | MIDC/CEO/३२७३५/२०१७<br>Order from Sanjay Sethi, CEO, MIDC | Appointment of Nodal Officer, Shri Vikram Kumar, Joint Chief Executive Officer |
| ५. | १९.०९.२०१७ | भूसंपादन/डी-३८०३७<br>श्रीमती वैदेही रानडे, महाव्यवस्थापक (भूसंपादन) मऔविमं यांनी लिहिलेले पत्र | चौकशीकरीता आवश्यक असलेले म.औ.वि.म अधिनियम १९६१, नियम १९६२ व इतर कागदपत्रे सादर करणेबाबत |
| ६. | ३०.१०.२०१७ | श्री. सुनील पोरवाल, अपर मुख्य सचिव (उद्योग), मंत्रालय यांना लिहिलेले पत्र | समितीच्या कामकाजासाठी उद्योग विभागातर्फे केंद्रस्थ अधिकारी नेमण्याबाबत |
| ७. | ३०.१०.२०१७ | श्री. शाम लाल गोयल, अपर मुख्य सचिव (राजशिष्टाचार), सामान्य प्रशासन विभाग यांना लिहिलेले पत्र | मागील १५ वर्षांच्या कालावधीतील (२८.०८.२००२ पासून पुढे) संबंधित मंत्री, राज्य मंत्री, त्यांचे खाजगी सचिव यांची माहिती मागविण्याबाबत.. |
| ८. | ०२.११.२०१७ | केंद्रस्थ अधिकारी (नोडल ऑफिसर) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी यांना लिहिलेले पत्र | दिनांक २८.०८.२०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे परि. ५ अन्वये आवश्यक ती मदत करण्याबाबत.. |
| ९. | ०२.११.२०१७ | क्र.आयडीसी-२०१७/प्रक्र ७०७/उद्योग-१४, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे कक्ष अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविमं यांना लिहिलेले पत्र | दिनांक २८.०८.२०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे परि. ५ अन्वये चौकशी समितीस आवश्यक ती मदत करण्याबाबत.. |
| १०. | १०.११.२०१७ | एमआयएन-१२१७/प्रक्र १८८(भाग १)/२१, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांनी मा. अध्यक्ष, एक सदस्यीय चौकशी समिती यांना लिहिलेले पत्र | मागील १५ वर्षांच्या कालावधीतील (२८.०८.२००२ पासून पुढे) संबंधित मंत्री, राज्य मंत्री, त्यांचे खाजगी सचिव यांची माहिती |
| ११. | १६.११.२०१७ | श्री. सुनील पोरवाल, अपर मुख्य सचिव (उद्योग), मंत्रालय यांना लिहिलेले पत्र | म.औ.वि.म. कडून प्राप्त तक्त्यातील माहितीवर अभिप्राय मागविण्याबाबत |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | २२.११.२०१७ | श्री. सुनील पोरवाल, अपर मुख्य सचिव (उद्योग), मंत्रालय यांना लिहिलेले पत्र | विभागीय केंद्रस्थ अधिकारी, डॉ. मा. को. भोसले, उप सचिव (उद्योग) यांना चर्चेसाठी बोलविण्याबाबत |
| १३. | १४.१२.२०१७ | श्री. नारायण राणे, माजी आमदार व तत्कालीन मंत्री (उद्योग) यांना लिहिलेले पत्र | शासन निर्णयाच्या परि. २(अ) ते (ई) नुसार मागील १५वर्षात प्रश्नाधीन जमीनीच्या निर्णयाबाबतचे अभिप्राय |
| १४. | १४.१२.२०१७ | श्री. सुभाष देसाई, मा. मंत्री (उद्योग) यांना लिहिलेले पत्र | शासन निर्णयाच्या परि. २(अ) ते (ई) नुसार प्रश्नाधीन जमीनीच्या निर्णयाबाबतचे अभिप्राय |
| १५. | १५.१२.२०१७ | श्री. नारायण राणे, माजी आमदार व तत्कालीन मंत्री (उद्योग) यांनी लिहिलेले पत्र | एक महिन्याची मुदतवाढ मिळण्याबाबत |
| १६. | १८.१२.२०१७ | श्री. सुभाष देसाई, मा. मंत्री (उद्योग) यांना लिहिलेले पत्र | एक आठवडयाची मुदतवाढ मिळण्याबाबत |

श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसूचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्याबाबत

श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांची नियुक्ती करणेबाबत

21/8/17

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमआयएन-१२१७/ प्र.क्र.१८८/ १७/ २१
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ ऑगस्ट, २०१७.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसुचीत करण्याच्या श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री, उद्योग यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत विधानसभा व विधान परिषद सदस्यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात उपस्थित केलेल्या आरोपांची चौकशी करण्याचे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी आश्वासन दिले आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या सदर आश्वासनाच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

१. श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता.इगतपूरी, जि.नाशिक, येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसुचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्यासाठी श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

२. सदर चौकशीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल:-

अ) प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रातील जमीन गैर अधिसुचित करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मागील १५ वर्षात अन्य औद्योगिक क्षेत्रात व प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात जमीन गैर अधिसुचित करण्याचा निर्णय घेतला आहे का ?

आ) उक्त क्षेत्र गैरअधिसुचित करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियम अथवा महामंडळाच्या जमीन विषयक अधिनियम/ नियम/ मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार गैरअधिसुचित करण्यात आले आहे का ?

इ) उक्त क्षेत्र गैर अधिसुचित प्रकरणी Conflict of Interest निदर्शनास येतो का?

ई) उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने अन्य इतर महत्वाच्या त्रूटी/ उणीवा निदर्शनास येतात का ?

३. उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने लागणारा संपूर्ण अभिलेख मागविण्याचे तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना चौकशीस बोलाविण्याचे अधिकार श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव; एक सदस्सीय समिती यांना असतील.

४. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाने तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे चौकशी समितीस त्वरीत उपलब्ध करुन द्यावीत.

५. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाने श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांना कार्यालयीन जागा, कर्मचारीवृंद, प्रिंटर,स्टेशनरी इ. अनुषंगिक बाबी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करावी.

६. श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांना मानधन देण्याबाबत तसेच कालावधीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०८२८१५४४५०७७०७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Somnath Namdeo Bagul

Digitally signed by Somnath Namdeo Bagul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Somnath Namdeo Bagul
Date: 2017.08.28 15:35:32 +05'30'

(सो. ना. बागुल)

सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव.
२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव.
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
५) प्रधान सचिव,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
६) प्रधान सचिव,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई
८) महालेखापाल-१(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
९) श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती.
१०) उप सचिव (आस्थापना),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
११) निवड नस्ती,कार्यासन-२१.

K P Bakshi IAS (Retd)
Former Additional Chief Secretary (Home)
Maharashtra

Place Mumbai
Date 31/08/2017

**Confidential**

My Dear Sanjay,

Please find शासन निर्णय क्रमांक - एमआयएन - १२१७ /प्र.क्र. १८८/ १७/२१ dated August 28, 2017 of GAD attached herewith.

I will need an initial briefing by you and your next subordinate officers looking after following subjects:

1. Acquisition of land.
2. Allotment of land to industries.
3. Denotification of land.
4. The rules and regulations, conduct of business of the corporation etc.

You may kindly come along with these officers and the Company Secretary on September 6, 2017 at 3.00 p.m. in the MIDC meeting hall at World Trade Centre, Centre 1, 12th floor, Cuffe Parade, Mumbai – 400005.

With best wishes,

Yours Sincerely

(K.P.Bakshi)

To,
**Shri.Sanjay Sethi**
CEO, MIDC,
World Trade Centre,
Centre No.1, 12th Floor,
Cuffe Parade,
Mumbai – 400 005.

श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसूचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्याबाबत

श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांची नियुक्ती करणेबाबत

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एमआयएन-१२१७/ प्र.क्र.१८८/ १७/ २१

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २८ ऑगस्ट, २०१७.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसुचीत करण्याच्या श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री, उद्योग यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत विधानसभा व विधान परिषद सदस्यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात उपस्थित केलेल्या आरोपांची चौकशी करण्याचे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी आश्वासन दिले आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या सदर आश्वासनाच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

१. श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता.इगतपूरी, जि.नाशिक, येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसुचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्यासाठी श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

२. सदर चौकशीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल:-

अ) प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रातील जमीन गैर अधिसुचित करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मागील १५ वर्षात अन्य औद्योगिक क्षेत्रात व प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात जमीन गैर अधिसुचित करण्याचा निर्णय घेतला आहे का ?

आ) उक्त क्षेत्र गैरअधिसुचित करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियम अथवा महामंडळाच्या जमीन विषयक अधिनियम/ नियम/ मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार गैरअधिसुचित करण्यात आले आहे का ?

इ) उक्त क्षेत्र गैर अधिसुचित प्रकरणी Conflict of Interest निदर्शनास येतो का?

ई) उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने अन्य इतर महत्वाच्या त्रूटी/ उणीवा निदर्शनास येतात का ?

३. उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने लागणारा संपूर्ण अभिलेख मागविण्याचे तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना चौकशीस बोलाविण्याचे अधिकार श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांना असतील.

४. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाने तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे चौकशी समितीस त्वरीत उपलब्ध करुन द्यावीत.

५. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाने श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांना कार्यालयीन जागा, कर्मचारीवृंद, प्रिंटर,स्टेशनरी इ. अनुषंगिक बाबी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करावी.

६. श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांना मानधन देण्याबाबत तसेच कालावधीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०८२८१५४४५०७७०७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Somnath Namdeo Bagul

Digitally signed by Somnath Namdeo Bagul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=..., serialNumber=..., cn=Somnath Namdeo Bagul
Date: 2017.08.28 ...

(सो. ना. बागुल)

सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव.

२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव.

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.

४) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई

५) प्रधान सचिव,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई

६) प्रधान सचिव,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई

८) महालेखापाल-१(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),मुंबई

९) श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती.

१०) उप सचिव (आस्थापना),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई

११) निवड नस्ती,कार्यासन-२१.

K P Bakshi IAS (Retd)
Former Additional Chief Secretary (Home)
Maharashtra
kpbplang@gmail.com
+91 9821927673

Place
Date
8th September 2017

**Dear Sri Sethi,**

As discussed on the 6th of September 2017, you are requested to please appoint a nodal officer, giving name, designation and contact details.

The Nodal Officer should take care that confidentiality is maintained and any exchange of information is done through the specially created personal email-Id of the Nodal Officer and that of mine which I will communicate to the Nodal Officer after appointment.

K.P. Bakshi, IAS (Retd.)
Chairman
One man Inquiry Committee
MIDC

Recd
8-9-17

Discipline is the bridge between goals and accomplishment.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION
(A Government of Maharashtra Undertaking)

No. MIDC/CEO/32735/2017
Date : 14.09.2017

**ORDER**

Read : Letter dated 8th September 2017 by the Chairman, one man Enquiry Committee, MIDC

In pursuance to the letter referred above, I hereby appoint Vikram Kumar, Jt. Chief Executive Officer (DMIC) as a Nodal Officer. His contact details are as follows :

Contact No. : Tel. No. 022-2687 9071
Cell No. : 90040 33033
Email : vikramkumar@midcindia.org

Sanjay Sethi
(Sanjay Sethi)
Chief Executive Officer
MIDC, Mumbai

Copy to : 1) Chairman, One man Inquiry Committee, MIDC
2) Vikram Kumar, Jt.Chief Executive Officer (DMIC), MIDC, Mumbai 400 093

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
मुख्यालय - उद्योग सारथी, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३.

जा.क्र. भूसंपादन/ D-38037 दि. 90/9/2096

प्रति,
मा. श्री. के.पी. बक्षी,
अध्यक्ष, एक सदस्यीय समिती,

19.9.17

विषय : मा. मंत्री (उद्योग) तथा अध्यक्ष, मऔविम यांची मौजे गोंदे दुमाला व वाडीव-हे, ता. इगतपूरी जि. नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसूचित करणेच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्याबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. एमआयएन-१२१७/प्र.क्र.१८८/१७/२१, दि. २८.०८.२०१७.

महोदय,

संदर्भीय शासन निर्णयाचे कृपया अवलोकन व्हावे.

एक सदस्यीय समितीची पहिली बैठक महामंडळाच्या जागतिक व्यापार केंद्र, मुंबई येथील कार्यालयात दिनांक ६.०९.२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात आली असून सदर बैठकीमध्ये सूचित केलेप्रमाणे खालील कागदपत्रांच्या प्रती सोबत जोडून सादर करण्यात येत आहेत.

1) MID Act 1961.
2) MID Rules 1962.
3) Land Regulations 1975.
४) Land Manual.

आपली विश्वासू,

(वैदेही रानडे)
महाव्यवस्थापक (भूसंपादन)
मऔविम, मुंबई-९३

K P Bakshi IAS (Retd)
Former Additional Chief Secretary (Home)
Maharashtra & Chairman, Experts'Committee
Godavari Integrated State Water Plan
+91 9821927673, kpbolang@gmail.com

दिनांक ३० ऑक्टोबर २०१७

प्रिय श्री पोरवाल,

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २८.०८.२०१७ च्या शासन निर्णय क्रमांक : एमआयएन-१२१७/प्र.क्र.१८८/१७/२१ अन्वये, श्री. सुभाष देसाई, मा. मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदे दुमाला आणि वाडिवरे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसूचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्याकरिता एक सदस्यीय समितीवर माझी नेमणूक केली आहे. (प्रत संलग्न)

२. उपरोक्त शासन निर्णयात नमुद केल्यानुसार या समितीच्या कामकाजाकरिता कर्मचारीवृंद, प्रिंटर, स्टेशनरी इ. अनुषंगिक बाबी उद्योग, उर्जा व कामगार विभागाने उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. तथापि, या समितीचे काम मर्यादीत कालावधीत पूर्ण करावयाचे असल्याने, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विषयाशी निगडीत असलेल्या आपल्या विभागातील सह सचिव/उप सचिवाची या समितीच्या कामकाजाकरिता नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. तसेच या सह सचिव/उप सचिवाचे नाव, कार्यालयीन व निवासी दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी सुध्दा तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा.

३. या समितीचे कामकाज सुरु झाले असून आपल्या विभागातील या कामासाठी नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यास याबाबतीत उपलब्ध असलेल्या/नसलेल्या माहितीसह उद्या मंगळवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, ९ वा मजला, जागतीक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई येथे माझ्यासमवेत प्राथमिक बैठकीसाठी पाठविण्याची तजवीज करावी, ही विनंती.

शुभेच्छा सह,

आपला स्नेहांकित,

(के.पी. बक्षी)
अध्यक्ष, एकसदस्यीय चौकशी समिती

सोबत : सहपत्र

प्रति,
श्री. सुनील पोरवाल,
अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

Discipline is the bridge between goals and accomplishment

श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसूचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्याबाबत

श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांची नियुक्ती करणेबाबत

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एमआयएन-१२१७/ प्र.क्र.१८८/ १७/ २१

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २८ ऑगस्ट, २०१७.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसुचीत करण्याच्या श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री, उद्योग यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत विधानसभा व विधान परिषद सदस्यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात उपस्थित केलेल्या आरोपांची चौकशी करण्याचे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी आश्वासन दिले आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या सदर आश्वासनाच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

१. श्री.सुभाष देसाई, मा.मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता.इगतपुरी, जि.नाशिक, येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसुचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्यासाठी श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्सीय समिती यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

२. सदर चौकशीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल:-

अ) प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रातील जमीन गैर अधिसुचित करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मागील १५ वर्षात अन्य औद्योगिक क्षेत्रात व प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात जमीन गैर अधिसुचित करण्याचा निर्णय घेतला आहे का ?

आ) उक्त क्षेत्र गैरअधिसुचित करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियम अथवा महामंडळाच्या जमीन विषयक अधिनियम/ नियम/ मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार गैरअधिसुचित करण्यात आले आहे का ?

इ) उक्त क्षेत्र गैर अधिसुचित प्रकरणी Conflict of Interest निदर्शनास येते का?

ई) उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने अन्य इतर महत्वाच्या त्रुटी/ उणीवा निदर्शनास येतात का ?

३. उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने लागणारा संपूर्ण अभिलेख मागविण्याचे तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना चौकशीस बोलाविण्याचे अधिकार श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्यीय समिती यांना असतील.

४. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाने तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे चौकशी समितीस त्वरीत उपलब्ध करुन द्यावीत.

५. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाने श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्यीय समिती यांना कार्यालयीन जागा, कर्मचारीवृंद, प्रिंटर,स्टेशनरी इ. अनुषंगिक बाबी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करावी.

६. श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्यीय समिती यांना मानधन देण्याबाबत तसेच कालावधीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०८२८१४४५०७७०७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Somnath Namdeo Bagul

(सो. ना. बागुल)

सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव.
२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव.
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
५) प्रधान सचिव,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
६) प्रधान सचिव,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई
८) महालेखापाल-१(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
९) श्री.के.पी.बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव, एक सदस्यीय समिती.
१०) उप सचिव (आस्थापना),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
११) निवड नस्ती,कार्यासन -२१.

गोपनीय/हात बटवड्याने

दिनांक ३० ऑक्टोबर २०१७

प्रिय

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २८.०८.२०१७ च्या शासन निर्णय क्रमांक : एमआयएन-१२१७/प्र.क्र.१८८/१७/२९ अन्वये, श्री. सुभाष देसाई, मा. मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील अधिग्रहीत जमीन गैर अधिसूचीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्याकरिता एक सदस्यीय समितीवर माझी नेमणुक केली आहे. (प्रत संलग्न)

२. उपरोक्त शासन निर्णयात नमुद केल्यानुसार या समितीच्या चौकशीचा एक भाग म्हणून मागील १५ वर्षाच्या कालावधीतील (२८.०८.२००२ पासून पुढे) उद्योग मंत्री, उद्योग राज्यमंत्री व त्यांचे नस्त्या हाताळणारे खाजगी सचिव यांची नांवे व त्यांचा कालावधी खाली नमुद केलेल्या तक्त्यानुसार उपलब्ध करुन देण्यात यावा. मागील १५ वर्षातील सर्व संबंधितांची नांवे व कालावधी शुक्रवार ३ नोव्हेंबर २०१७ पर्यंत निश्चितपणे देण्यात यावा व तक्त्यातील उर्वरित माहिती प्राप्त झाल्यानंतर लगेच पाठविण्यात यावी ही विनंती.

| उद्योग मंत्र्यांचे नांव | कालावधी | संपर्क क्रमांक (कार्यालयीन निवासी भ्रमणध्वनी) | ईमेल आयडी | उद्योग मंत्र्यांच्या खाजगी सचिवांचे नांव (नस्ती हाताळणारे) | कालावधी | संपर्क क्रमांक (कार्यालयीन निवासी भ्रमणध्वनी) | ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| उद्योग राज्य मंत्र्यांचे नांव | कालावधी | संपर्क क्रमांक (कार्यालयीन निवासी भ्रमणध्वनी) | ईमेल आयडी | उद्योग राज्यमंत्र्यांच्या खाजगी सचिवांचे नांव (नस्ती हाताळणारे) | कालावधी | संपर्क क्रमांक (कार्यालयीन निवासी भ्रमणध्वनी) | ईमेल आयडी |
| | | | | | | | |

३. उपरोक्त माहिती चौकशीकरीता आवश्यक असल्याने ती मिळाल्यास, आवश्यक असलेल्या व्यक्तिंशीच संपर्क साधून या कामकाजासंदर्भात हवी असलेली माहिती घेता येईल.

आपला

( के.पी. बक्षी )
अध्यक्ष, एकसदस्यीय चौकशी समिती

प्रति,
श्री. शाम लाल गोयल,
अपर मुख्य सचिव (राजशिष्टाचार),
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सोबत : सहपत्र

दिनांक २ नोव्हेंबर २०१७

प्रति
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
उद्योग सारथी,
अंधेरी (पूर्व), मुंबई ९३

संदर्भ : १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एमआयएन १२१७/प्र.क्र. १८८/१७/२१ दिनांक २८.८.२०१७
२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, पत्र क्र. आयडीसी-२०१७/प्र.क्र. ७०७/उद्योग १, दिनांक २.११.२०१७

विषय : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एमआयएन १२१७/प्र.क्र. १८८/१७/२१ दिनांक २८.८.२०१७ मधील परि. ५ अन्वये सहाय्य करणेबाबत...

महोदय,

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एमआयएन १२१७/प्र.क्र. १८८/१७/२१ दिनांक २८.८.२०१७ मधील परि. ५ अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने एक सदस्यीय चौकशी समिती यांचेसाठी कार्यालयीन जागा, कर्मचारीवृंद, प्रिंटर, स्टेशनरी इत्यादी अनुषंगिक बाबी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत.

२. त्याप्रमाण उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये या सर्व बाबी उपलब्ध करुन देण्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कळविले आहे.

३. मी स्वतः अध्यक्ष, महाराष्ट्र जलसंपत्ति नियमन प्राधिकरण या पदावर कार्यरत असल्यामुळे मला कार्यालयीन जागेची कायम स्वरुपी आवश्यकता लागणार नाही. तथापि, ज्या ज्या वेळी आवश्यकता भासेल त्या त्या वेळी जागतीक व्यापार केंद्र, कफ परेड येथिल महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या समिती कक्षाचा वापर करुन घेता येईल. तसेच महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या अंधेरी येथील नोडल अधिकारी, श्री. विक्रम कुमार यांचे समिती कक्ष या ठिकाणी कार्यालयीन कामकाज करुन घेता येईल.

४. कर्मचारीवृंद, प्रिंटर, स्टेशनरी इ. साठी महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून मला कोणत्याही प्रकारची आवश्यकता भासणार नाही. परंतु मी जागतीक व्यापार केंद्र येथील माझ्या अध्यक्ष कार्यालयाची जागा, महाराष्ट्र जलसंपत्ति नियमन प्राधिकरणाचे माझे खाजगी सचिव तसेच माझे शिपाई व प्राधिकरणाचे सल्लागार यांचा वापर करुन घेणार आहे. जेणेकरुन कामकाजात सुलभता राहून गोपनियता पाळता येईल आणि महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या कर्मचारीवृंदाला त्यांच्या कार्यालयाकडून माझ्या कार्यालयाकडे ये-जा करण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच प्रिंटर, स्टेशनरी आणि अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक अनुषंगीक बाबी मी महाराष्ट्र जलसंपत्ति नियमन प्राधिकरणाकडून उपलब्ध करुन घेईन.

५.	या सर्व कर्मचारीवृंद, प्रिंटर, स्टेशनरी, सल्लागार इ. चा वापर महाराष्ट्र जलसंपत्ति नियमन प्राधिकरणाकडून करुन घेत असल्याने महाराष्ट्र जलसंपत्ति नियमन प्राधिकरणाला त्याबद्दल मोबदला देणे आवश्यक आहे. सुरुवातीला अंदाजे रु .५ लाख महाराष्ट्र जलसंपत्ति नियमन प्राधिकरणाला देण्याची तजवीज करावी. समितीचे कामकाज अंदाजे डिसेंबर अखेर पर्यंत चालणार असल्याची शक्यता असल्यामुळे जानेवारी २०१८ मध्ये सर्व खर्चाचा हिशोब आणि उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच जर काही पैसे ऊरले तर ते परत करण्यात येतील. महाराष्ट्र जलसंपत्ति नियमन प्राधिकरणाचा एक क्रॉस धनादेश सोबत जोडण्यात येत आहे. त्याप्रमाणे मोबदल्याबाबत कृपया लवकरात लवकर कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला

( के.पी. बक्षी )
अध्यक्ष, चौकशी समिती व अध्यक्ष,
महाराष्ट्र जलसंपत्ति नियमन प्राधिकरण

सोबत : सहपत्रे

**MIDC / Jt. CEO (DMIC)**
**IFMS No.** PS
**Dated :** 07/11/2017

महाराष्ट्र शासन

क्र. आयडीसी-२०१७/प्र.क्र. ७०७/उद्योग-१४
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२.
Email- a.ugale@nic.in
दिनांक - २/११/२०१७

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
अंधेरी, मुंबई.

विषय :- श्री. के.पी. बक्षी, सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव यांची चौकशी समिती.

संदर्भ :- १) साप्रवि पत्र क्र. एमआयएन-१२१७/प्र.क्र.१८८/१७/२१ दि. २८/१०/२०१७
२) अध्यक्ष, एक सदस्यीय चौकशी समिती यांचे पत्र दि. ३०/१०/२०१७.

महोदय,

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २८/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मा. मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदे-दुमाला आणि वाडिवरे, ता इगतपुरी, जि. नाशिक येथील जमिन विना अधिसूचित करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्यासाठी श्री. के.पी. बक्षी, सेवा निवृत्त अप्पर मुख्य सचिव यांची एक सदस्यीय समिती म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर समितीच्या कामकाजाकरीता कर्मचारीवृंद, प्रिंटर, स्टेशनरी इ. अनुषंगिक बाबी उपलब्ध करुन देण्याबाबत सदर समिती अध्यक्षांनी संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. सदर पत्राची प्रत यासोबत पाठविण्यात येत असून सदर पत्रात नमूद बाबी सदर समितीस उपलब्ध करुन द्याव्यात ही विनंती.

आपला

(अनिलकुमार श. उगले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

मा.श्री. के.पी. बक्षी, अध्यक्ष, एक सदस्यीय समिती यांचे स्वीय सहाय्यक.

महाराष्ट्र शासन

क्र. आयडीसी-२०१७/प्र.क्र. ७०७/उद्योग-१४
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
email- a.ugale@nic.in
दिनांक : २/११/२०१७ .

कार्यालयीन आदेश

संदर्भः- १) सामान्य प्रशासन विभाग,शा.नि.क्र.एमआयएन-१२१७/प्र.क्र.१८८/१७/२१, दि. २८/८/२०१७

२) अध्यक्ष, एक सदस्यीय चौकशी समिती यांचे पत्र दि. ३०/१०/२०१७.

मा. मंत्री (उद्योग) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची मौजे गोंदेदुमाला आणि वाडिवरे, ता. इगतपूरी, जि. नाशिक येथील जमिन विना अधिसूचित करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत चौकशी करण्यासाठी श्री. के.पी. बक्षी, निवृत्त अप्पर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समितीची संदर्भाधिन सा.प्र.वि. शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. सदर समितीस मदत करण्यासाठी डॉ. श्री. ना.को. भोसले, उपसचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांची नोडल अधिकारी म्हणून व डॉ. श्री. रमेश सुरवाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची सह नोडल अधिकारी म्हणून याद्वारे नियुक्ती करण्यात येत आहे.

नोडल अधिकारी व सह नोडल अधिकारी यांचे नाव, कार्यालयीन दुरध्वनी क्र, निवासी दुरध्वनी क्र. ,भ्रमणध्वनी क्र. व ईमेल आयडी खालील प्रमाणे आहे.

डॉ. श्री. ना.को. भोसले नोडल अधिकारी - कार्यालय दूरध्वनी क्र.- ०२२-२२८२४५११
- भ्रमणध्वनी क्र.- ७०५७१८९८८८
- ई-मेल आयडी- *namdeo.bhosale@nic.in*

डॉ. श्री. रमेश सुरवाडे, सह नोडल अधिकारी - कार्यालय दूरध्वनी क्र.- ०२२-२६८७८११३

- भ्रमणध्वनी क्र.- ९५९४६०२४४४

-ईमेलआयडी - rameshsurwade@midcindia.org

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(अनिलकुमार रा. उगले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति, :

डॉ. श्री. ना.कों.भोसले उपसचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई

डॉ. श्री. रमेश सुरवाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (३), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई.४

प्रत:

मा. श्री. के.पी. बक्षी, अध्यक्ष, एक सदस्यीय चौकशी समिती यांचे स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, ९ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफपरेड, मुंबई.

मा. अपर मुख्य सचिव (उद्योग) यांचे स्विय सहायक

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई.

उप सचिव (आस्थापना), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

दूरध्वनी क्र. (०२२)२२७९ ३३४७

क्र. एमआयएन-१२१७/प्र.क्र. १८८ (भाग-१)/२१ दि. १०.११.२०१७

प्रति,

श्री. के. पी. बक्षी,
अध्यक्ष, एकसदस्यीय चौकशी समिती,
मुंबई

विषय :- मागील १५ वर्षांच्या कालावधीतील मा. उद्योग मंत्री, मा. उद्योग राज्यमंत्री व त्यांचे नस्त्या हाताळणारे खाजगी सचिव यांची नावे, कालावधी व यांच्याविषयी माहिती

संदर्भ:- आपले दि. ३०.११.२०१७ चे पत्र

आदरणीय महोदय,

संदर्भाधिन पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, मा. मुख्यमंत्री/मंत्री/राज्यमंत्री यांची नावे व त्यांना नेमून दिलेले विभाग याबाबतची अधिसूचना साप्रवि/१८ कार्यासनाकडून निर्गमित केली जाते. त्याअनुषंगाने त्या कार्यासनाकडून दि. ०६.११.२०१७ च्या पत्रासोबत अधिसूचनेच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सदर अधिसूचनेच्या प्रतींवरुन व या कार्यासनाच्या उपलब्ध अभिलेखावरुन, मागील १५ वर्षांतील मा. उद्योग मंत्री, मा. उद्योग राज्यमंत्री व त्यांचे नस्त्या हाताळणारे खाजगी सचिव यांची नावे, कालावधी व इतर माहिती सोबतच्या तक्त्यानुसारउपलब्ध करुन देण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(मा. कॉ. शाळी)
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग

सोबत- वरीलप्रमाणे

| अ. क्र. | मा. मंत्री, उद्योग यांचे नाव | कालावधी | संपर्क क्रमांक | ई-मेल आय डी | मा. मंत्री, उद्योग यांचे खाजगी सचिवांचे नाव | कालावधी | संपर्क क्रमांक | ई-मेल आय डी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. पतंगराव कदम | दि. ०९.०३.२००१ ते १५.११.२००४ | ९८७०४८९९९९ | roffice@yahoo.com | श्री. अभय यावलकर, तत्कालिन अपर जिल्हाधिकारी (सध्या भा.प्र से. सेवेत) | दि. २५.०१.२००३ ते ०८.११.२००४ | | |
| २ | श्री. अशोक चव्हाण | दि. १६.११.२००४ ते २७.०६.२००५ व दि. ०३.०७.२००५ ते २०.०२.२००९ | | | श्री. राजीव निवतकर, तत्कालिन अपर जिल्हाधिकारी (सध्या भा.प्र से. सेवेत) | दि.०९.११.२००४ ते १६.१२.२००८ | ९६६४६६६६६६ | rajivnivatkar@gmail.com |
| ३ | श्री. बाळासाहेब थोरात (श्री. अशोक चव्हाण यांच्या परदेश दौ-याच्या कालावधीत) | दि. २८.०६.२००५ ते ०२.०७.२००५ | | | डॉ. प्रमोद बोरसे, खाजगी सचिव | मार्च २००५ ते फेब्रुवारी २००८ | | |
| ४ | श्री. नारायण राणे | दि. २१.०२.२००९ ते ८.११.२००९ | | | | | | |
| ५ | श्री. राजेंद्र दर्डा | दि. ०९.११.२००९ ते ११.११.२०१० | | | श्री. पारस बोथरा, अति. मु. का. अ. | | | |
| ६ | श्री. नारायण राणे | दि. २०.११.२०१० ते २८.०९.२०१४ | | | श्री. रा. ल. पाटील, प्रतिवेदक, विधानमंडळ सचिवालय | दि. २०.११.२०१० ते ११.१०.२०१३ | | |
| ७ | श्री. प्रकाश महेता | दि. ०२.११.२०१४ ते ०५.१२.२०१४ | ०२२-२१०२१४९० | bjpmlaprakashamehta@gmail.com | डॉ. श्री. ल. पुलकुंडवार, अवर सचिव | दि. ०७.०२.२०१५ ते ०५.१२.२०१४ | ९९६७४१७३३४ | shrikantpulkund@gmail.com |
| ८ | श्री. सुभाष देसाई | दि. ०६.१२.२०१४ ते आजतागायत | ९८२१०३७०४० | subhash.desai12@gmail.com | श्री. सुशिल गर्जे, विक्रीकर विभाग | दि. ०५.०१२.२०१० ते आजतागायत | | |

| क्र. | मा. राज्यमंत्री, उद्योग यांचे नाव | कालावधी | संपर्क क्रमांक | ई-मेल आय डी | मा. राज्यमंत्री, उद्योग यांचे खाजगी सचिवांचे नाव | कालावधी | संपर्क क्रमांक | ई-मेल आय डी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. जयदत्त क्षीरसागर | दि. ०९.०३.२००१ ते ०९.०३.२००३ | ९८२१५७३३३६ | kshirsagarj@ gmail.com | | | | |
| २ | श्री. राजेश टोपे | दि. १०.०३.२००३ ते १५.११.२००४ | ९४२२२१६१११ | rajeshtope११@ gmail.com | श्री. अविनाश सुभेदार, (सध्या भा.प्र.से. सेवेत) | दि.१६.०३.२००१ ते १३.०७.२००४ | ९८२००९७६४३ | avisubhedar@rediffmail.com |
| ३ | श्री. बाबासाहेब कुपेकर | दि. १३.०७.२००४ ते १५.११.२००४ | | | श्री. श्रीनिवास डी. जाधव | | | |
| ४ | श्री. राणा जगजितसिंह पाटील | दि. १६.११.२००४ ते ८.११.२००९ | ९८२०२८९७३२ | ranapatil@ yahoo.com | डॉ. राजेश देशमुख (सध्या भा.प्र.से. सेवेत) | दि. १९.११.२००४ ते | ९८२१५२७५६६ | rajeshdeshmukh १०@yahoo.com |
| ५ | श्री. सचिन अहिर | दि. ०९.११.२००९ ते १९.११.२०१० | | | श्री. सुधिर नाईक, उपायुक्त, बृहन्मुंबई म.न.पा. | दि. ०५.१२.२००९ ते १९.११.२०१० | | |
| | | दि. २०.११.२०१० ते २८.०९.२०१४ | | | श्री. प्रशांत भामरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी | दि. २०.११.२०१० ते २८.०९.२०१४ | | |
| ६ | श्री. प्रविण पोटे पाटील | दि. ०६.१२.२०१४ ते आजतागायत | ९३७०१५२२०८ | potepravin@rediffmail.com | श्री. प्रविण ठाकरे | | | |

K P Bakshi IAS (Retd)
Former Additional Chief Secretary (Home)
Maharashtra
kpbplang@gmail.com
+91 9821927673

Place
Date

**गोपनीय/ तात्काळ** दिनांक १७ नोव्हेंबर २०१७

प्रिय

एक सदस्यीय समितीकडे सोपविलेल्या चौकशीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून, समितीने मागणी केलेल्या परिशिष्टाप्रमाणे विहित नमुन्यात त्यांनी स्वत: व नोडल अधिकाऱ्यांनी स्वाक्षांकित केलेली तक्त्यांची ( एक्सेल शीटस् क्र.१ ते ७०पर्यंत)(३५, ४९, ५५, ६१, व ६७ वगळून) प्रत आपल्या व उद्योग विभागातील नोडल अधिकाऱ्यांच्या स्वाक्षांकित अभिप्रायासाठी पाठविण्यात आल्या आहेत.

दिनांक ११ डिसेंबर २०१७ पासून विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु होत असून, त्यापूर्वी या चौकशी समितीचा अहवाल सादर करावयाचा आहे. सबब आपणांकडे पाठविण्यात आलेल्या परिशिष्टांवर आपल्या विभागाचे मत आपल्या स्वाक्षरीसह बुधवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०१७ पर्यंत समितीकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आल्यास, समितीला पुढील कार्यवाही करुन वेळेत चौकशी अहवाल शासनास सादर करता येईल.

आपला

( के. पी. बक्षी )
एक सदस्यीय समिती अध्यक्ष

१९/११/१७

श्री. सुनिल पोरवाल,
अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

Discipline is the bridge between goals and accomplishment.

दिनांक २२ नोव्हेंबर २०१७

प्रिय

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून त्यांचे नोडल अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेले चौकशी समितीने विहीत केलेल्या नमुन्यातील तक्ते समितीस प्राप्त झाल्यानंतर ते उद्योग विभागाच्या अभिप्रायकरिता नोडल अधिकारी, उप सचिव, डॉ. ना. को. भोसले यांच्याकडे पाठविण्यात येत आहेत.

या बाबत असे निदेश देण्यात येत आहेत की, या सर्व प्रकरणांच्या माहिती व नस्तींसह आपल्या विभागातील नोडल अधिकारी, डॉ भोसले, उप सचिव यांना पुढील चर्चेसाठी एक सदस्यीय समितीचे कार्यालय, जागतीक व्यापार केंद्र, ९ वा मजला, कफ परेड, मुंबई येथे पाठविण्याची तजवीज करावी, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

(के.पी. बक्षी)

अध्यक्ष, एकसदस्यीय चौकशी समिती

प्रति,
श्री. सुनील पोरवाल,
अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

22/11/17

के.पी. बक्षी, भा.प्र.से. (से.नि.)
माजी अपर मुख्य सचिव (गृह)
महाराष्ट्र शासन
+९१ ९८२११९२७६७३, ईमेल kpbplang@gmail.com

क्रमांक : चौकशी/मऔविम/ दिनांक : १४ डिसेंबर २०१७

विषय : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एमआयएन १२१७/
प्र.क्र.१८८/१७/२१, दिनांक २८/०८/२०१७

महोदय,

उपरोक्त शासन निर्णयान्वये माझी एक सदस्यीय समितीपदी नियुक्ती झाली असून सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद २ (अ) ते (ई) नुसार मागील १५ वर्षात प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात व अन्य औद्योगिक क्षेत्रात जमीन गैर अधिसूचित करण्याचा निर्णय घेतला आहे काय, तसेच असे करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिनियम अथवा महामंडळाचे जमीन विषयक अधिनियम/नियम/मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार गैर अधिसूचित करण्यात आले आहे काय, व उक्त गैर अधिसूचित प्रकरणी Conflict of Interest निदर्शनास येते काय, अशा विविध बाबींवर चौकशी करावयाची आहे.

२. या संदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून, या कालखंडातील विना अधिसूचित करण्यात आलेल्या औद्योगिक क्षेत्रांच्या प्रकरणांची माहिती, त्यांच्या कनिष्ठतम कर्मचारी ते वरिष्ठ अधिका-यांपर्यंत नोंदलेल्या अभिप्रायासह तपशीलवार यादी मागविण्यात आली होती. त्याचप्रमाणे त्यावर उद्योग विभागातील अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव यांच्यासह त्यांच्या खालील अधिका-यांनी नोंदलेल्या मताचा तपशीलासह माहिती एकत्रित करण्यात आली आहे.

३. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राप्त तपशीलवार यादी व त्यावर उद्योग विभागातील अधिका-यांनी नोंदविलेल्या मुद्यांचा तपशील दर्शविणारे तक्ते सोबत जोडण्यात येत आहेत.

४. उपरोक्त तक्त्यांतील काही विशिष्ट प्रकरणांत असे दिसून येते की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून त्या प्रकरणात जमीन गैर अधिसूचित करण्याबद्दल अनुकूल अभिप्राय दिले गेले नव्हते. त्या-त्या प्रकरणात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जमीन अधिसूचित करण्यात येऊ नये असे

स्पष्ट प्रतिकूल अभिप्राय दिले होते. तसेच उद्योग विभागामार्फत सुध्दा संबंधित सचिवांपर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मताशी सहमती दाखवून जमीन अधिसूचित करण्यात येऊ नये अशी स्पष्ट शिफारस करण्यात आली होती. तथापि, उपरोक्त प्रकरणांत असे दिसून येते की, आपण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या व उद्योग विभागाच्या मतांशी असहमती दाखवून जमीन गैर अधिसूचित करण्याबद्दलचा निर्णय त्या प्रकरणांमध्ये घेतलेला आहे. काही प्रकरणांत जरी कारणमिमांसा देण्यात आली असली, तरी ही कारणमिमांसा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व उद्योग विभागाने दिलेल्या सविस्तर कारणांना अधिक्रमित करण्यासाठी पुरेशा प्रमाणात आपल्या स्तरावर ऊहापोह करणारी आहे असे दिसून येत नाही. किंबहुना, पुरेशी कारणे विशद केलेली नाहीत असे समितीला वाटते.

५. याबाबत तसेच आपण घेतलेल्या त्या निर्णयांबाबत आपण संबंधित नस्तीमध्ये नमूद केलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर काही मुद्दे विषद करावयाचे असल्यास आपण कृपया २१ डिसेंबर २०१७, या तारखेपर्यंत आपले म्हणणे या समितीस कळवावे ही विनंती.

६. दिनांक २१ डिसेंबर २०१७ या तारखेपर्यंत आपल्याकडून काही अभिप्राय प्राप्त न झाल्यास आपल्याला त्यावर पुढील भाष्य करावयाचे नाही असे गृहित धरुन उपलब्ध माहितीच्या आधारावर ही समिती आपले मत चौकशी अहवालामध्ये व्यक्त करेल.

आपला,

(के.पी. बक्षी)
एक सदस्यीय समिती

सोबत : सहपत्रे

(म.औ.वि.म. व उद्योग विभागाकडून प्राप्त अभिप्राय तक्ते .१०,११,१७,२१,२२,३३,३६,४८,५१,५३,६०,६७,७१,७४,७५,७९,९१,९८,१११,११७,११८,१२२,१२४,१३४, १३५,१४०,१४१,१४४ व १६०)

श्री. नारायण राणे,
माजी आमदार,
आदिश बंगला, जुहू तारा रोड, माणेकजी कूपर हायस्कूलजवळ,
सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई :

**अतितात्काळ/ गोपनीय** **हात बटवडयाने**

श्री. नारायण राणे,
माजी आमदार,
आदिश बंगला,जुहू तारा रोड,
माणेकजी कुपर हायस्कूल जवळ,
सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई

**(कृपया इतरांनी पाकीट उघडू नये)**

प्रेषकः
श्री. के.पी. बक्षी,
भा.प्र.से. (से.नि.)

के.पी. बक्षी, भा.प्र.से. (से.नि.)
माजी अपर मुख्य सचिव (गृह)
महाराष्ट्र शासन
+९१ ९८२१९१२७६७३, ईमेल kpbplang@gmail.com

क्रमांक : चौकशी/मऔविम/ दिनांक : १४ डिसेंबर २०१७

विषय : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एमआयएन १२१७/ प्र.क्र.१८८/१७/२१, दिनांक २८/०८/२०१७

महोदय,

उपरोक्त शासन निर्णयान्वये माझी एक सदस्यीय समितीपदी नियुक्ती झाली असून सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद २ (अ) ते (ई) नुसार मागील १५ वर्षात प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रात व अन्य औद्योगिक क्षेत्रात जमीन गैर अधिसूचित करण्याचा निर्णय घेतला आहे काय, तसेच असे करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिनियम अथवा महामंडळाचे जमीन विषयक अधिनियम/नियम/मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार गैर अधिसूचित करण्यात आले आहे काय, व उक्त गैर अधिसूचित प्रकरणी Conflict of Interest निदर्शनास येते काय, अशा विविध बाबींवर चौकशी करावयाची आहे.

२. या संदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून, या कालखंडातील विना अधिसूचित करण्यात आलेल्या औद्योगिक क्षेत्रांच्या प्रकरणांची माहिती, त्यांच्या कनिष्ठतम कर्मचारी ते वरिष्ठ अधिका-यांपर्यंत नोंदलेल्या अभिप्रायासह तपशीलवार यादी मागविण्यात आली होती. त्याचप्रमाणे त्यावर उद्योग विभागातील अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव यांच्यासह त्यांच्या खालील अधिका-यांनी नोंदलेल्या मताचा तपशीलासह माहिती एकत्रित करण्यात आली आहे.

३. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राप्त तपशीलवार यादी व त्यावर उद्योग विभागातील अधिका-यांनी नोंदविलेल्या मुद्यांचा तपशील दर्शविणारे तक्ते सोबत जोडण्यात येत आहेत.

४. उपरोक्त तक्त्यांतील काही विशिष्ट प्रकरणांत असे दिसून येते की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून त्या प्रकरणात जमीन गैर अधिसूचित करण्याबद्दल अनुकूल अभिप्राय दिले गेले नव्हते. त्या-त्या प्रकरणात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जमीन अधिसूचित करण्यात येऊ नये असे

स्पष्ट प्रतिकूल अभिप्राय दिले होते. तसेच उद्योग विभागामार्फत सुध्दा संबंधित सचिवांपर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मताशी सहमती दाखवून जमीन अधिसूचित करण्यात येऊ नये अशी स्पष्ट शिफारस करण्यात आली होती. तथापि, उपरोक्त प्रकरणांत असे दिसून येते की, आपण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या व उद्योग विभागाच्या मतांशी असहमती दाखवून जमीन गैर अधिसूचित करण्याबद्दलचा निर्णय त्या प्रकरणांमध्ये घेतलेला आहे. काही प्रकरणांत जरी कारणमिमांसा देण्यात आली असली, तरी ही कारणमिमांसा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व उद्योग विभागाने दिलेल्या सविस्तर कारणांना अधिक्रमित करण्यासाठी पुरेशा प्रमाणात आपल्या स्तरावर ऊहापोह करणारी आहे असे दिसून येत नाही. किंबहुना, पुरेशी कारणे विशद केलेली नाहीत असे समितीला वाटते.

५. याबाबत तसेच आपण घेतलेल्या त्या निर्णयांबाबत आपण संबंधित नस्तीमध्ये नमूद केलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर काही मुद्दे विषद करावयाचे असल्यास आपण कृपया २१ डिसेंबर २०१७, या तारखेपर्यंत आपले म्हणणे या समितीस कळवावे ही विनंती.

६. दिनांक २१ डिसेंबर २०१७ या तारखेपर्यंत आपल्याकडून काही अभिप्राय प्राप्त न झाल्यास आपल्याला त्यावर पुढील भाष्य करावयाचे नाही असे गृहित धरुन उपलब्ध माहितीच्या आधारावर ही समिती आपले मत चौकशी अहवालामध्ये व्यक्त करेल.

आपला,

(के.पी. बक्षी)
एक सदस्यीय समिती

सोबत : सहपत्रे

(म.औ.वि.म. व उद्योग विभागाकडून प्राप्त अभिप्राय तक्ते .२,१२,१४,२३ व ७२)

श्री. सुभाष देसाई,
मंत्री (उद्योग व खनीकर्म)
पुरातन बंगला, मलबार हिल,
मुंबई.

**अतितात्काळ/ गोपनीय** **हात बटवडयाने**

श्री. सुभाष देसाई,
मंत्री ( उद्योग व खनीकर्म ),
पुरातन बंगला,
मलबार हिल पो.स्टे. जवळ,
मलबार हिल, मुंबई

**(कृपया इतरांनी पाकीट उघडू नये)**

प्रेषक:
श्री. के.पी. बक्षी,
भा.प्र.से. (से.नि.)

नारायण राणे

माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

१५ डिसेंबर, २०१७

श्री. के. पी. बक्षी,
माजी अपर मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन,
मुंबई

विषय : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एमआयएन १२१७/प्र.क्र.११८/१७/२१, दि.२८.०८.२०१७

आपले दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजीचे वर नमूद संदर्भाबाबतचे पत्र मिळाले. पत्रासोबत जोडलेली कागदपत्रे पाहिली. अनेक प्रकरणांची संगतवार कागदपत्रे यामध्ये दिसून आलेली नाहीत. ही सर्व माहिती शासनाच्या अभिलेखामध्ये आहे व सहज रित्या मिळविण्यास बराच कालावधी लागू शकतो. पत्रात आपण असे नमूद केले आहे की, माझे म्हणणे मी २१ डिसेंबर, २०१७ पर्यंत कळवावे. एक आठवड्याच्या कालावधीत पुरेशा कागदपत्रांशिवाय कोणतेही अभिप्राय देणे अशक्य आहे.

वर नमूद वस्तुस्थिती लक्षात घेता माझे म्हणणे सादर करण्यासाठी किमान एक महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी.

आपला नम्र,

( नारायण राणे )

Received
15/12/17

■ कार्यालय : आर्केडिया सहकारी सोसायटी, ९ वा मजला, रुम नं. ९०५, एन.सी.पी.ए. रोड, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. ■ दूरध्वनी : ०२२-२२०४२१००/ २२०४
■ निवास : अधीश, फियानो इस्टेट, जुहू तारा रोड, मणिकजी कूपर शाळेसमोर, सांताक्रुझ (प.), मुंबई - ४०० ०४९.
■ दूरध्वनी : ०२२-२६६०९७७७, फॅक्स : ०२२-२६६०३४४४, ई-मेल : narayanrane52@gmail.com

**सुभाष देसाई**
**मंत्री**
**उद्योग, खनिकर्म**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*
*min.industry@maharashtra.gov.in*

दि.१८.१२.२०१७

प्रति,
मा.के.पी.बक्षी,
माजी अपर मुख्य सचिव, (गृह)

विषय : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एमआयएन १२१७/प्र.क्र.१८८/ १७/२१, दि.२८.८.२०१७

संदर्भ : आपले चौकशी /मऔविम, दि.१४.१२.२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये आपण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिनियम अथवा महामंडळाचे जमीन विषयक अधिनियम / नियम/ मार्गदर्शक तत्वे यांच्यानुसार विनाअधिसूचित केलेल्या प्रकरणात माझे म्हणणे दि.२१ डिसेंबर, २०१७ च्या आत आपले समितीकडे सादर करण्यास कळविलेले आहे. सद्यस्थितीत नागपूर येथे महाराष्ट्र विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु असल्याकारणाने कृपया माझे म्हणणे सादर करण्यासाठी एक आठवड्याचा कालावधी वाढवून मिळणेस विनंती आहे.

13
19/12

(सुभाष देसाई)